तरुण भारत संवाद

# श्रवणीय अन् प्रेक्षणीय 'संगीत मत्स्यगंधा'

भरतशास्त्र

श्रीराम खाडीलकर



धि गोवा हिंदू असोसिएशननिर्मित आणि नाट्यसंपदा कलामंच प्रकाशित 'संगीत मत्स्यगंधा' या एकेकाळी म्हणजे तब्बल पन्नास वर्षापूर्वी गाजलेल्या नाटकाचे प्रयोग तरुण नटसंचात नुकतेच सादर केले जाऊ लागले आहेत. प्रा. वसंत काटेकर लिखित या नाटकाचे दिग्दर्शन संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी केले आहे. मुळात हे नाटक आशालता यांना डोळ्यासमोर ठेवून म्हणजे त्यांच्यासाठी प्रा. कानेटकरांनी लिहिले होते. त्यामुळे सत्यवती उर्फ मत्स्यगंधा ही मध्यवर्ती भूमिका अत्यंत ताकदीसह लिहिली गेली आहे. याच कारणाने या नाटकात आनंद, दु:ख, क्लेश, मानसिक, यातना, शक्तिप्रदर्शन, आदर्श, आकांक्षा, सूड अशा असंख्य छटा स्वाभाविकपणे प्रतिबिंबित झाल्या आहेत.

सगळे कलाकार ताज्या दमाचे आणि व्यक्तिरेखांची नाटकातली जी वये आहेत त्यांना मिळत्याजुळत्या वयोगटातलीच आहेत; तसेच दोनही मुख्य कलाकार उत्तम गाणारे असल्याने एक चांगला योग जुळून आला आहे. ही गोष्ट आहे सत्यवतीची. तिच्या अंगाला माशांचा गंध येतो म्हणून तिला मत्स्यगंधा असे म्हणतात. एका धीवराच्या म्हणजेच कोळ्याच्या घरी ती लहानाची मोठी होते. एकदा हिमालयात जायला निघालेल्या पराशर मुनींची आणि तिची गाठभेट होते. आपले सर्वस्व अर्पण केलेल्या मत्स्यगंधेच्या शरीराला येणाऱ्या माशांच्या गंधाऐवजी आपल्या तप सामर्थ्याने पराशर कस्तुरीचा गंध तिला देतो. यानंतर बऱ्याच नाट्यपूर्ण घडामोडी आणि प्रा. कानेटकरांचे सुंदर संवाद असल्याने नाटकाच्या सादरीकरणातली रंगत वाढतच जाते.

अभिनयाच्या बाबतीत यातली सगळ्यात सशक्त भूमिका जर कुणी केली असेल तर राहुल मेहेंदळे यांनी. भीष्मप्रतिज्ञा म्हणजे काय, याचा अर्थ त्यामुळे अनेकांना आज समजेल. दिलेल्या शब्दाला जागणारा, प्रसंगी आपल्या इच्छा आकांक्षांची होळी करणारा कर्तव्यदक्ष भीष्म त्यांनी आवाजातल्या चढ-उताराबरोबरच आंगिक अभियानातून छान उभा केला आहे. पूजा राईबाग यांनी केलेली अंबा ही तुलनेने छोटेखानी असलेली भूमिका त्यांनी प्रेम. संताप पराकोटीचा क्रोध. निराशा अशा अनेक भावनांचे प्रभावी दर्शन आपली अभिनयक्षमता दाखवून दिली आहे.

मिळालेल्या संधीचा लाभ उठवणाऱ्या सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणारी पैशावर प्रेम असलेली चंडोल ही भूमिका अमोल कुलकर्णी यांनी नेटकेपणाने केली. संजीव तांडेल यांचा धीवर आणि शशी गंगावणे यांचा प्रियदर्शन सगळ्यासमवेत शोभून दिसलेत. सत्यवती खरोखरच देहभान विसरून गर्द सभोवती हे पद गात असल्याचा अनुभव यातली सत्यवतीची भूमिका करणाऱ्या केतकी चैतन्य यांनी जसा दिला तसाच अनुभव सत्यवतीचा चित्रांगद आणि विचित्रवीर्य अशा दोन्ही मुलांच्या मृत्यूनंतर अर्थशून्य भासे. मज हा कलह जीवनाचा हे पद गाताना सुद्धा दिला. केतकी चैतन्य यांच्या रूपाने संगीत रंगभूमीला एक कलाकार मिळालाय. तीच गोष्ट नचिकेत लेले यांच्या बद्दलची त्यांचाही आवाज चांगला आहे. वरचे सुरही त्यांचे चांगले लागतात, ही जमेची बाजू म्हणावी लागेल. पराशराच्या भूमिकेत ते बरेचदा प्रोफाईलमध्ये दिसतात. ते जाणीवपूर्वक आहे किंवा काय हे लक्षात आले नाही असो; या नाटकाचे विशेष असे की, हे नाटक आपल्याला आजच्या काळात संगीत नाटक एन्जॉय केल्याचे समाधान देते. दिग्दर्शक संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी नाटकातल्या गायकीच्या अंगाला धक्का न लावता सगळ्यांकडून व्यक्तिरेखांची वैशिष्ट्ये अधोरेखित होतील, अशा प्रकारे हे नाटक सादर केले आहे. रंगावृती करतानासुद्धा त्यांनी उत्तम कल्पकतेचे दर्शन घडवले आहे. सचिन गावकर यांनी नाटकाची गरज भागेल असे मोजके आणि नेटके नेपथ्य उभे केले आहे. अशोक पत्की यांनी पार्श्वसंगीताच्या छान जागा शोधून प्रसंगाची परिणामकारकता अधिक वाढेल याची काळजी घेतली आहे. तीच गोष्ट प्रकाशयोजनाकार शीतल तळपदे यांची आहे. त्यांनीही नाटकातल्या भाव दर्शनाला महत्त्व येईल आणि प्रसंगाची उत्कटता वाढेल अशी प्रकाशयोजना केली आहे. सगळ्या नव्या कलाकारांनी सादर केलेली संगीत मत्स्यगंधा हे नाटक म्हणजे मा. दत्ताराम बापू आणि प्रा. कानेटकर यांच्या स्मृतिंना केलेले अभिवादन ठरावे.